**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ईश्वर अंकुर शेलार
निराळे वस्ती, गौरा नगर, सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (विशेष),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.११.२००८ |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (विशेष),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. अनिल विपत

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री. सुभाष बी. सावसकर

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

बी.ओ.टी. तत्त्वावर जागा देण्यामागचा सोलापूर महानगरपालिकेचा हेतू कोणता आहे, सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंता भांडारामध्ये पडलेले लोखंडी स्टील भ्रष्टाचारामधले आहे का व किती वर्षांपासून गंज खात पडले आहे व किती किलो आहे, तसेच किती अधिकारी व कर्मचारी सन १९९५ ते आजपर्यंत भ्रष्टाचारामध्ये निलंबित व डिस्मीस करण्यात आले त्यांची नावे व भ्रष्टाचाराचे स्वरूप, बीओटी तत्त्वावर शहरामध्ये एक हजार पेक्षा जास्त फूट जागा दिल्या गेलेल्या व्यक्तींच्या किंवा ट्रस्टचे नावाने किती फूट जागा दिली व किती वर्षांसाठी, तसेच किती रुपये मासिक भाड्याने दिली याचा तपशील व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

सोलापूर महानगरपालिकेमधील भूखंडांच्या तपशिलासह पंधरा मुद्दयांची माहिती मागणारा अर्ज अपीलकर्ता श्री. ईश्वर अंकुर शेलार यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे केला होता. विविध विभागांकडील माहिती मागितली असल्यामुळे त्या त्या विभागाकडे अर्ज पाठवून श्री. शेलार यांना माहिती देण्यात आली. परंतु माहिती विहित मुदतीत मिळाली नाही व अपूर्ण, दिशाभूल करणारी मिळाली या कारणावरून श्री. शेलार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (विशेष), सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान याद्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर अपिलाची सुनावणी घेण्याचे उभय बाजूंच्या मान्यतेने ठरले. त्यानंतर सुनावणी होऊन राहिलेली माहिती आठ दिवसांत देण्याचा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (विशेष), सोलापूर महानगरपालिका यांनी दिला. त्याविरूध्द श्री. शेलार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माहिती विलंबाने, अपूर्ण, अर्धवट व दिशाभूल करणारी मिळाल्याचे प्रथम अपिलात, तसेच याही अपिलात श्री. शेलार यांनी नमूद केले आहे. बी.ओ.टी. तत्त्वावरील दिलेल्या जागा व महानगरपालिकेतील भ्रष्टाचार याबाबतची माहिती आपल्याला हवी असल्याचे श्री. शेलार यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाने दि.१७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. सदर कार्यक्रमास अपीलकर्ता उपस्थित नव्हते, त्यामुळे सुनावणी घेण्यात आली. त्यावेळीही ते गैरहजर होते.

श्री. शेलार यांचा मूळ अर्ज दि. ७.९.२००६ चा असून दि. १३.९.२००६ व दि. १५.९.२००६ रोजी त्यांना माहिती दिली आहे. त्यांच्या मागणीनुसार आणखी काही माहिती दि. ६.१०.००६ रोजी दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका श्री. सुभाष सावस्कर यांनी नमूद केले.

सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंता भंडारामध्ये पडलेले लोखंडी स्टील भ्रष्टाचारामधले आहे का, व किती वर्षापासून गंजखात पडले आहे व किती किलो आहे, अशासारखी विचारणा श्री. शेलार यांनी केली आहे, तर मुरारजी पेठ येथील सुशील रसिक सभागृह, हुतात्मा स्मारक अशा

सोलापूरमधील प्रसिध्द वास्तुंबाबतची माहिती विचारली असता, 'सदर जागेचा सिटी सर्व्हे नंबर कळविल्यानंतर माहिती देण्यात येईल,' असे उत्तर जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांनी दिले आहे. उभय बाजूंची ही कृती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तत्त्वाशी सुसंगत नाही. महानगरपालिकेच्या सार्वजनिक निवडणुकीच्या कामाचे कारण नगर उपअभियंता, व सहाय्यक आयुक्त, यांनी अनेक अपिलांमध्ये नमूद केलेले दिसते, तसे ते येथेही केलेले आहे. माहितीच्या अधिकारातील अर्जांच्या हाताळणीसाठी या सबबीखाली महिन्यांचा कालावधी लागणे योग्य नाही. त्याबाबत दोन्ही अधिकाऱ्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २९.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विद्याधर केशरचंद दोशी
जीवन-तारा, १२६, मोरारजी पेठ,
सरस्वती चौक, सोलापूर-४१३००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स.),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७४ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (स.),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.सुभाष सावस्कर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.९.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>रेल्वेलाईन घर नं.१६५/६ येथील विनापरवाना बांधकामाबाबत, श्री.मकरंद विश्वनाथ चिंदरकर यांना दि.८.९.२००५ व २५.१०.२००५ ने पाठविलेल्या पत्रांच्या प्रती. दि.२२.८.२००५ रोजी नियमित केलेली मान्यता दि.१९.९.२००५ रोजी सक्षम मान्यतेने रद्द केली आहे काय, नियमित मान्यता दिलेल्या अधिकाऱ्याचे नाव,पद. महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे मान्यता देण्यास कोण सक्षम आहे, अशाच अधिकाऱ्याने मान्यता दिली अगर कसे. अन्य अधिकारी /सदस्य यांनी मान्यता दिली असल्यास त्या परिपत्रकाची प्रत. दि.२३.११.२००५ च्या अर्जावर घेतलेल्या निर्णयाची माहिती. नगर अभियंता अपिलीय प्राधिकारी नसताना अपिलावर उत्तर देऊ शकतात काय? | |

## विवेचन

रेल्वेलाईन घर नं.१६५/६ येथील जागेत झालेल्या विनापरवाना बांधकामाच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.विद्याधर केशरचंद दोशी यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे दि.५.७.२००५ रोजी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.१४.७.२००५ रोजी उत्तर दिले. याच संदर्भात व याच अनुषंगाने श्री.दोशी यांनी दि.२६.१२.२००५ रोजी केलेल्या माहिती मागणीच्या अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२५.१.२००६ रोजी उत्तर दिले. 'या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे अंतर्गत कलम १९(१) नुसार अपील दाखल करावे लागणार असून तत्पूर्वी आणखी माहिती घेऊन सविस्तर, विचारपूर्वक व संपूर्ण माहिती अवलोकन केल्यानंतरच अपील दाखल करावयाचे अगर

कसे याचा निर्णय घेणे संयुक्तिक होणारे आहे,' असे नमूद करुन श्री.दोशी यांनी संबंधित कागदपत्रांच्या अवलोकनासाठी दि.३१.१.२००६ रोजी अर्ज केला. त्यावर जन माहिती अधिकाऱ्यांनी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे श्री.दोशी यांनी दि.३.३.२००६ रोजी स्मरणपत्र दिले. त्यानंतर 'अंदाजे गेली चार-पाच वर्षे'असा माहितीशी संबंधित कालावधी नमूद करुन दि.१३.३.२००६ रोजी याच मागणीसाठी माहितीच्या अधिकाराखाली त्यांनी पुन्हा अर्ज केला. त्यावर जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता यांनी अभिलेख अवलोकनासाठी दि.१७.७.२००६ रोजी येण्याविषयीचे पत्र दि.१५.७.२००६ रोजी पाठविले. अभिलेखाचे दि.९.८.२००६ रोजी अवलोकन केल्यानंतर श्री.दोशी यांनी कागदपत्रांच्या प्रतींची मागणी केली. अखेर दि.२५.९.२००६ रोजी या कागदपत्रांच्या प्रती श्री.दोशी यांना विनामूल्य देण्यात आल्या.

या सर्व अर्जांच्या अनुषंगाने श्री.दोशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (स), सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांनी माहिती विलंबाने दिली असल्याचे स्पष्टपणे नमूद करुन शास्तीबाबतचे त्यांचे म्हणणे सादर करण्याचा, तसेच आठ दिवसात पूर्ण माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२४.७.२००६ रोजी दिला. यानंतरही योग्य प्रकारे माहिती न मिळाल्यामुळे अभिलेख-अवलोकनातील सोळा कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींची मागणी श्री.दोशी यांनी नगर अभियंता यांच्याकडे दि.१०.८.२००६ रोजी केली. 'अशी पूर्तता सात दिवसांचे आत न झाल्यास हाच अर्ज मूळ माहितीचा अधिकार २००५ च्या अंतर्गत समजण्यात येईल,' असे त्यांनी त्यात नमूद केले. तसेच अपिलीय प्राधिकारी यांनी आदेशात म्हटलाप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्याचे विलंबाबद्दलचे म्हणणे ऐकून घेऊन काय कार्यवाही केली, याची विचारणा करणारे पत्र सहाय्यक आयुक्त(स) यांना श्री.दोशी यांनी दि.४.९.२००६ रोजी दिले. 'सुनावणीमध्ये झालेल्या निर्णयानुसार आपणांस माहिती देण्याकामी प्रस्तुत प्रकरण हाताळणारे श्री.एस.एस.लामकाने, अवेक्षक यांनी विलंब केल्याने त्यांच्याविरुध्द केंद्रीय माहितीचा अधिकार २००५ चे नियम २०(२) अन्वये लागू

असलेल्या सेवा नियमान्वये शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित केलेली आहे,' असे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. विलंबामुळे माहिती निःशुल्क देण्याची मागणी श्री.दोशी यांनी दि.१२.९.२००६ रोजी केली, त्यानुसार दि.२५.९.२००६ राजी त्यांना माहिती निःशुल्क देण्यात आली. 'यानंतर देखील अपीलकर्त्याने दि.२२.६.२००७ व दि.२६.६.२००७ रोजी माहिती मागणी (कोर्ट केसबाबत कोणते कोर्ट-किती तारखा, महानगरपालिका वकील कोण व पत्ता?) केल्यावरुन त्यांना ताबडतोब माहिती देण्यात आलेली आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका श्री.सावस्कर यांनी दि.२०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. 'माहिती देण्यास २१३ दिवसांचा विलंब झाला असून संबंधितांना शास्ती करावी,' या मागणीसाठी श्री.दोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१७.६.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदरच्या अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

'सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंत्याकडे दैनंदिन कामाची व्याप्ती प्रचंड असून निपटारा होण्याचा सतत कसोशीने प्रयत्न असतो. रस्त्याची कामे, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकामावर कारवाई करणे, कार्यालयामध्ये आलेल्या नागरिकांचे निरसन करणे, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे क्रमप्राप्त असून, नागरिकांचे अंतर्गत बांधकाम विषयक वाद, त्या अनुषंगाने व बांधकाम, कोर्ट कामे, महानगरपालिका सर्वसाधारण सभा बैठका, स्थायी समिती बैठका, जिल्हाधिकारी यांच्याकडील बैठका, महाराष्ट्र शासनाकडील विविध याजनेच्या अनुषंगाने मंत्रालय येथील बैठका व लोकशाही दिन इत्यादी कामांची व्याप्ती मोठी आहे. तसेच दि.२०.१.२००६ सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००६-२००७ ची प्रक्रिया सुरु होऊन दि.२.२.२००७ रोजी मतमोजणीनंतर समाप्त झालेली आहे. सदर प्रक्रियेमध्ये वॉर्डनिहाय सर्व्हेक्षण करणे, वॉर्ड चतुःसीमा निश्चित करणे, वॉर्डनिहाय मतदार याद्या तयार करणे, मतदान केंद्र निश्चित

करणे, मतदार केंद्र तयार करणे, मतमोजणी कक्ष उभा करणे या कामात व्यस्त असल्याने व निवडणुकीचे कामास सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे असल्याने इत्यादी कामाच्या व्याप्तीमुळे अपीलकार यांना माहिती देण्यास विलंब झालेला असून तो झालेला विलंब जाणूनबुजून हेतुपुरस्सर नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका श्री.सुभाष सावस्कर यांनी दि.२०.१२.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे. तसेच 'अपीलकर्ता यांनी बऱ्याच अंशी केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्रश्नोत्तर स्वरुपाची व प्रकरणी पुढील कार्यवाहीबाबतची माहिती अपेक्षित केली आहे. अर्जदार यांना उपलब्ध माहिती देण्यात आलेली आहे,' असेही नमूद केले आहे. त्याचीच पुनरावृत्ती श्री.सावस्कर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(स), सोलापूर महानगरपालिका श्री.अनिल विपत यांनी आयोगापुढील सुनावणीत केली. 'माहितीच्या अधिकारातील अर्जांची दखल घेण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता श्री.सुभाष सावस्कर हे प्रत्येक वेळी हीच कारणे पुढे करीत असतात. वेळोवेळी दाखल केलेली कागदपत्रे लक्षात घेता २१३ दिवस विलंब झाला आहे, त्यामुळे शास्ती व्हावी,' अशी मागणी श्री.दोशी यांनी लेखी निवेदनाद्वारे केली. माहिती देण्यास कामाच्या व्यापामुळे १४ दिवस विलंब झाला आहे, असे प्रतिपादन श्री.सावस्कर व श्री.विपत यांनी केले.

श्री.दोशी यांची मूळ मागणी संबंधित ठिकाणचे बेकायदेशीर बांधकाम पाडण्याबाबतची होती, हा त्यांचा व्यक्तिगत विषय असून सार्वजनिक हिताशी त्याचा संबंध नाही, तरीही त्याबाबत महानगरपालिकेच्या पातळीवरील कार्यवाही करुन वेळोवेळी त्याची माहिती श्री.दोशी यांना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन श्री.सावस्कर व श्री.विपत यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

उपरोकत विवेचनानुसार आयोग पुढील निष्कर्षाप्रत येत आहे :

(१) कामाची व्याप्ती व निवडणूक प्रक्रिया ही श्री.सावस्कर यांनी बहुसंख्य अपिलांमधील निवेदनांमध्ये व आयोगापुढील सुनावणीत नमूद केलेली कारणे आहेत, ती मान्य करता येणार नाहीत.

(२) श्री.दोशी यांचा मूळ अर्ज दि.२५.७.२००५ चा असून दि.२५.९.२००६ रोजी माहिती देण्यात आली आहे, असे सकृत्दर्शनी दिसते. परंतु श्री.दोशी यांच्या प्रत्येक अर्जाला जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली उत्तरे, श्री.दोशी यांनी केलेले वेगवेगळे अर्ज, सातत्याचा पत्रव्यवहार, लेखी निवेदने यामुळे, व घटनाक्रम विचारात घेता नेमका मूळ अर्ज कोणता, याबद्दल संभ्रम निर्माण होतो. तसेच दिलेल्या माहितीवर पूरक अर्ज करुन तो मूळ अर्जाचाच भाग मानावा, अशी त्यांची भूमिका दिसते. ती योग्य नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याप्रमाणेच अपीलकर्त्यानेही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेली नेमकी प्रक्रियाच अवलंबिली पाहिजे.

(३) श्री.दोशी यांना माहिती विलंबाने दिली गेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(४) माहिती देण्याबाबत संबंधित अभियंता श्री.एस.एन.लामकाने यांना वारंवार लेखी व तोंडी सूचना देण्यात आल्या होत्या, परंतु विहित मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे विलंबास ते जबाबदार आहेत, असे श्री.सावस्कर व श्री.विपत यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनांमध्ये नमूद केले आहे. श्री.लामकाने यांना दिलेल्या लेखी सूचनांच्या प्रती त्यांनी सादर केल्या. दि.२०.११.२००८ रोजी श्री.सावस्कर यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनातही श्री.लामकाने यांच्यावरील जबाबदारीचा स्पष्ट उल्लेख केला असून त्यांना दिलेल्या ज्ञापनासह अनुषंगिक कागदपत्रे त्यांनी सादर केली आहेत. त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता श्री.सावस्कर यांनी श्री.लामकाने यांना दि.८.३.२००६ दि.२७.३.२००६, दि.७.३.२००६, दि.२१.४.२००६ व दि.१०.५.२००६ रोजी सूचना दिल्याचे दिसते. हे लक्षात घेता संबंधित माहिती देण्यास श्री.लामकाने जबाबदार ठरतात. पर्यायाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(४ व ५) मधील तरतुदीनुसार ते जन माहिती अधिकारी ठरत असल्यामुळे विलंबाबद्दलच्या कारवाईस ते पात्र ठरतात.

(५) श्री.दोशी यांनी मूळ अर्ज व पूरक अर्ज यासह एकत्रित मुदत गृहित धरुन, २१३ दिवस विलंब झाल्याचे म्हटले आहे. ते रास्त नाही.

(६) उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता श्री.दोशी यांचा दि.२६.१२.२००५ चा अर्ज व दि.२५.९.२००६ रोजी माहिती देण्यात आली हे गृहित धरल्यास २७३ दिवसांनी माहिती दिली. कनिष्ठ अभियंता श्री.लामकाने त्याला प्रामुख्याने जबाबदार आहेत, असे चित्र निर्माण होते. परंतु श्री.दोशी यांची कागदपत्रे पाहता तसा निष्कर्ष काढता येणार नाही. जन माहिती अधिकारी श्री.सावस्कर यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे, मात्र अपिलासाठी 'आणखी माहिती घेऊन सविस्तर, विचारपूर्वक व संपूर्ण माहिती अवलोकन केल्यानंतरच अपील दाखल करावयाचे किंवा कसे याचा निर्णय घेणे संयुक्तिक होणार आहे,' असे नमूद करुन श्री.दोशी यांनी दि.३१.१.२००६ रोजी अभिलेखाच्या अवलोकनाची मागणी केली आहे व दि.३.३.२००६ रोजी त्याबाबतचे स्मरणपत्र दिले आहे. त्यानंतर दि.१३.३.२००६ रोजी माहिती-मागणीचा अर्ज केला आहे. या साऱ्याचा विचार करता दि.१३.३.२००६ ही विलंब गणनेसाठी पायाभूत तारीख धरावी लागेल. श्री.सावस्कर यांनी श्री.लामकाने यांना वारंवार दिलेल्या लेखी सूचना लक्षात घेता विलंबाला श्री.लामकाने जबाबदार ठरतात, म्हणून ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता श्री.विद्याधर दोशी यांना १९६ दिवस विलंबाने माहिती दिली आहे. माहिती देण्यासाठी असलेले तीस दिवस मुदत वजा जाता १६६ दिवस विलंब झाला आहे. प्रतिदिनी रु.२५० प्रमाणे १६६ दिवसासाठी रु.४१५००/- शास्ती होते. परंतु कायद्यात शास्तीची कमाल मर्यादा ही रु.२५०००/- असल्याने

माहिती उशिरा माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी श्री.एस.एन.लामकाने यांना रु.२५०००/- इतकी शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्यांना सप्टेंबर २००९ या महिन्यात मिळणाऱ्या ऑगस्ट २००९ या महिन्याच्या वेतनातून कपात करुन ती दिनांक २०.९.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी करुन, तसेच संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात याची नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रतीसह अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.७.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४०१/ २००९/ पुणे | श्री. गोपाळ केशव परांजपे बी.७, फ्लॅट क्र.४३, जाई को.ऑप.हौ. सोसायटी, लोकमान्य नगर, शास्त्री मार्ग, नवी पेठ, पुणे-३० | सहाय्यक अभियंता, विकास योजना, झोन क्र.४, पुणे महानगर-पालिका, पुणे | उप अभियंता, विकास योजना, झोन क्र.४, पुणे महानगर-पालिका, पुणे | मे. लेक टाऊन डेव्हलपर्स, बिबवेवाडी, पुणे यांचे संबंधी व तत्संबंधित इतर विभागाकडील माहिती मिळणेबाबत | अपीलकर्त्याने अनेक माहिती अर्जांच्या अनुषंगाने आयोगाकडे एकच अपील दाखल केले आहे. प्रत्येक माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडे स्वतंत्र-पणे अपील करणे आवश्यक आहे. |
| २ | ७२३/ २००९/ पुणे | श्री. गजानन भिकाजी कुंभार सरस्वतीनगर, बर्फाचे कारखान्या-समोर, इंदापूर, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, जि. पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती इंदापूर, जि.पुणे | १९९७-९८ पासून २००८ पर्यंतच्या कुटुंब पत्रिका भरून घेऊन सुध्दा १३ महिने गेले तरी टोलवाटोलवीची तोंडी उत्तरेच फक्त दिली. दारिद्र्य रेषे-खालील कुटुंबास सवलती संदर्भात प्रांताधिकारी यांनी आदेश देऊनही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांनी दखल घेतली नाही. तदनुषंगाने माहिती मिळणेबाबत | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ७२४/२००९/पुणे | श्री. गजानन भिकाजी कुंभार सरस्वतीनगर, बर्फाचे कारखान्या-समोर, इंदापूर, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, इंदापूर, जि.पुणे | तहसीलदार इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | मंडलाधिकाऱ्याकडून प्रकरण क्रमांक व जावक क्रमांक पडल्या- नंतर अहवाल किती दिवस ठेवता येतो, पुढे केव्हा पाठविला जातो इ.अनुषंगिक माहिती | अपीलकर्त्याने म केलेली माहिती ज माहिती अधिकारी यांनी उक्त आदेश प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी. |
| ४ | ६६३/२००९/पुणे | श्री. पांडुरंग बाबुराव बेनके फ्लॅट नं.१०, क्लासिक, अङ्गादनगर, एस.आर.पी.एफ वानवडी, पुणे-२२ | उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग हातकणंगले, जि. कोल्हापूर | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर | दि. १.४.२००७ ते ११.११.२००८ पर्यंत लेखाशिर्ष ३०५४ खालील कामांबाबत व त्याअनुषंगाने माहिती मिळणेबाबत | अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशा-प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ दिवसात आयोगास सादर करून त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी व तसे आयोगास अवगत करावे. |
| ५ | ७४३/२००९ /पुणे | श्री. इसाक सदरूद्दीन शेख रा. लुमेवाडी, पो.खराटी, ता. इंदापूर, जि.पुणे | अध्यक्ष, सुफी हाजी हाफिज फत्तेमोहमद जोधपुरी दर्गा ट्रस्ट, लुमेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे | सहाय्य धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे-१ | २००१ ते २००८ पर्यंतचे न्यासाचे खर्चाचे तक्ते व ऑडिट नोटची नक्कल मिळणेची मागणी | १. मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठाने याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये दिलेल्या न्याय निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विश्वस्त न्यासास लागू होत नाही.<br>२. विश्वस्त न्यास हा सार्वजनिक प्राधिकरण ठरतो हे अपीलकर्त्याने दाखवून दिले पाहिजे.<br>३. धर्मादाय आयुक्तांनी नियंत्रक यंत्रणा म्हणून त्यांच्या अखत्यारीत येणारी माहिती अपीलकर्त्यास देणे बंधनकारक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यातील एकूण ५ अपिले अनुक्रमांक १ ते ५ ( अपील क्र.४०१/ २००९ /पुणे, ७२३/२००९/पुणे, ७२४ /२००९/पुणे, ६६३ /२००९/पुणे व ७४३/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ७२३/२००९/पुणे, ७२४/२००९/पुणे, ६६३/२००९/पुणे व ७४३/२००९/पुणे मधील जन माहिती अधिकारी यांनी निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार अपीलकर्त्यास त्वरित माहिती देऊन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

पुणे

दि. ३१ .७.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४५६ / २००९/ सांगली | राजाराम रामचंद्र जोशी कोकाटे पतसंस्थेनजीक, सांगलीवाडी, ता. मिरज, जि.सांगली | निवासी नायब तहसीलदार (महसूल) मिरज, जि.सांगली | तहसीलदार, मिरज, जिल्हा सांगली | तहसील कार्यालय, मिरज दि.३.८२००७ रोजी सं.नं.२६८/१,२,३, ४, (२६८/४अ, ४ब,/१, ३ब) संदर्भात दिलेल्या अर्जावरील जात इमाव हा शेरा कमी करणेबाबतच्या अर्जावर केलेल्या कार्यवाही - संदर्भातील तपशील | प्रत्येक वेगवेगळया माहिती अर्जानुसार आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. |
| २ | ४५७ /२००९/ सांगली | श्री.तुकाराम रखमाजी सूर्यवंशी रा.चांदोली वसाहत, सुभाषनगर, अंकलखोप पोस्ट अंकलखोप, ता.पलूस, जि.सांगली | निवासी नायब तहसीलदार , इस्लामपूर, जि.सांगली | तहसीलदार, इस्लामपूर, जिल्हा सांगली | मौजे आष्टा येथील स.नं.७६० अ बाबत क,ड,ई, चे उतारे व फेरफार नं. ३०८ ची सहीशिक्याची नक्कल मिळणेबाबत. | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते २ (अपील क्र.४५६/२००९ /सांगली, ४५७/२००९ /सांगली,) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०७-०७-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठा, पुणे/ येथे दाखल करण्यात आलेल्या खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत :-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४६६ / सांगली | श्री.संभाजीराव गोविंदराव ओलेकर मु.पो.कवठे महांकाळ, जिल्हा सांगली ४१६ ४०५ | उप अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ताराबाई पार्क , कोल्हापूर | अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ताराबाई पार्क , कोल्हापूर | कवठे महांकाळ येथील नवीन मिलेट्री कॅन्टीन समोरील गटारीचे बांधकामाच्या अनुषंगाने एकूण ०७ मुद्दयांची माहिती | एक मुद्दा वगळता माहिती विहीत मुदतीत दिली आहे.राहिलेली माहिती एक महिन्यात देण्याचे जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले असून अपिलकर्त्याने मान्यता दर्शक स्वाक्षरी केली आहे. मात्र मूळ अर्जापासून ३० दिवसांत माहिती देणे बंधनकारक असताना दोन वर्षानंतर एक महिना मुदत मागणे योग्य नाही. |
| २ | १०२१/ सांगली | श्री. बाळासो विठ्ठल जाधव लक्ष्मी-नारायण चौक, हरुगडे प्लॉट, सांगलीवाडी, ता.मिरज, जि.सांगली | १. निवासी नायब तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली | तहसीलदार, ता.जत, जि.सांगली | अपीलकर्त्याने दि.६.१०.२००६, २२.२.२००८ व २२.७.२००६ या कालावधी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती. | आवश्यक माहिती दिलेली असून, अपीलकर्त्याची मूळ मागणी खरेदी खत दुरुस्तीबाबत, म्हणजेच प्रथम कार्यवाहीची आहे. या अनुषंगाने आवश्यक सहकार्य करण्याचे जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | नमूद केले आहे. |
| ३ | १०२३/ सांगली | श्री.जनार्दन गणपत झेंडे शेती फार्म, अभय नगर, सपना प्रेस समोर, सांगली | गावकामगार तलाठी, सांगली | मंडळ अधिकारी, सांगली | जमीन अकृषिक आकारणीच्या वसूलीचे अधिकार व शासन परिपत्रक, तसेच सांगली शहरात एकूण बिनशेती प्लॉट किती याबाबत माहिती | आवश्यक माहिती मिळल्याचे अपीलकर्त्याने दि.२८.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. |
| ४ | १०२६/ सांगली | श्री.वसंत कृष्णा नाईक मु.पो.खलाटी, ता.जत, जि.सांगली | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, सांगली | तहसीलदार, सांगली, जि.सांगली | दि.१.११.१९६५ रोजी श्री.सदाशिव धोंडिबा नाईक यांनी स.नं.३५, ३७ व २०३ बाबत दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने निघालेल्या नोटिसा व आदेशाची प्रत | आवश्यक माहिती दोन दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ४ (अपील क्र.४६६/सांगली, १०२१/सांगली, १०२३/सांगली, १०२६/सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले आहे. असे अ.क्र.१ ते ४ अपिलांमध्ये नमूद केले आहे. त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास त्वरित सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व तद्नुषंगीक अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०१-०७-२००९.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठ येथे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४६९ / २००९/ सांगली | श्री.विजय रामचंद्र जोशी मु.पो.पळशी, ता.खानापूर, जि.सांगली | निवासी नायब तहसीलदार, खानापूर-विटा, ता.खानापूर, जि.सांगली | तहसीलदार, खानापूर-विटा, ता.खानापूर, जि.सांगली | मौजे पळशी येथील स.नं.१४१ या जमीन मिळकतीबाबत तहसीलदार, खानापूर यांनी दि. २८/४/०९ रोजी दिलेल्या हुकुमाची संपूर्ण नक्कल व त्यासंदर्भात एकूण १० मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| २ | ४७०/ २००९/ सांगली | श्री.विजय रामचंद्र जोशी मु.पो.पळशी, ता.खानापूर, जि.सांगली | निवासी नायब तहसीलदार, खानापूर-विटा, ता.खानापूर, जि.सांगली | तहसीलदार, खानापूर-विटा, ता.खानापूर, जि.सांगली | श्रीमती सुप्रिया बागवडे , तहसीलदार यांच्या सेवा विषयक बाबी , मत्ता व दायित्व तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अशा एकूण ८ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ४७१/ २००९ सांगली | श्री. रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली | सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली | जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली , जि.सांगली | शिधावाटप दुकानांबाबत, तसेच एकाच कुटुंबातील परवानाधारकाबाबत एकूण ६ मुद्दयांची माहिती | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ४. | ४७२/ २००९ सांगली | श्री. रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली | प्रभारी मालमत्ता व्यवस्थापक, (मिरज), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | उपायुक्त (मिरज), सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | बालगंधर्व नाट्यगृहातील पार्किंगबाबत महानगरपालिकेकडून कोणाचीही नेमणूक नसतानाही त्रयस्थ व्यक्तींकडून पार्किंग फी वसूल केली जात असल्याबाबत पोलीस स्टेशन ला केलेला अर्ज व त्यासंबंधातील कागदपत्रांच्या प्रती व नसल्यास त्यांना पाठीशी घालण्याच्या कारणांची संपूर्ण माहिती | १. अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत.<br>२. अपीलकर्त्याने मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. |
| ५ | ४७३/ २००९ सांगली | श्री. रामचंद्र नारायण जाधव १०० फुटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली | अन्न धान्य वितरण अधिकारी, सांगली | जिल्हा पुरवठा अधिकारी, सांगली | अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका व इतर ७ मुद्दयांबाबत माहिती | अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६. | १०१८/ सांगली | श्री.संदिप केशव पाटील ए १/११, सह्याद्रीनगर, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई ६७ | प्रशासन अधिकारी (आस्था) सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली | महानगरपालिके-तील वर्ग ३ व ४ च्या प्रकल्पग्रस्त उमेदवारां-सदर्भात माहिती | जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.१.०९ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास दिलेली माहिती योग्य आहे. खुलासा विचारणे हे माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनु. क्र. १ ते ६ (अपील क्र.४६९/२००९ /सांगली, ४७०/२००९ /सांगली, ४७१/२००९ /सांगली, ४७२/२००९ /सांगली, ४७३/२००९ /सांगली,व १०१८ /सांगली) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०७-०७-२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्याकडे दाखल केलेली खालील अपिले निकाली काढण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४७४ / २००९/ सातारा | श्री. संजय शंकर कांबळे रा.ताईगडेवाडी, (तळमावले), ता.पाटण, जि.सातारा | कक्ष अधिकारी, पंचायत समिती पाटण, ता.पाटण, जि.सातारा | गट विकास अधिकारी, वर्ग-१. पंचायत समिती पाटण, ता.पाटण, जि.सातारा | नागरिक सनद क्र.ग्रा.पं.७/कावी-१४१२/०६, सातारा जिल्हा परिषद, सामान्य प्रशासन विभाग-२, सातारा, दिनांक २०/०९/२००६ च्या तक्रारीबाबत | जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६.०२.२००९ च्या पत्रान्वये दिलेले उत्तर योग्य आहे. तथापि, अपीलकर्त्याच्या तक्रारीवरील कार्यवाहीची मागितलेली नेमकी माहिती जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसात अपीलकर्त्यास द्यावी. |
| २ | ४७५ / २००९/ सातारा | श्री. कुमार जोतिराम सोनावले एफ-२, कार्तिकराज अपार्टमेंट, पुष्कर मंगल कार्यालयामागे, विसावा नाका, सातारा | १. मुख्याध्यापक, श्रीपतराव पाटील हायस्कुल, करंजेपेठ, सातारा २. उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा | १. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा २. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा | इयत्ता ५ वी ते ७ वी व इयत्ता ८ वी ते १० वी साठी पदवीधर वेतनश्रेणी घेणा-या शिक्षकांची सन १९८३ ते २००८-०९ पर्यंत वर्षनिहाय यादी. | अपीलकर्त्याने दोन वेगवेगळ्या माहिती अर्जासंदर्भात एकच अपील आयोगाकडे केले आहे. अशा प्रकारे अनेक अर्जांसाठी एकत्रित अपील दाखलपात्र नाही. प्रत्येक अर्जावरील अपील स्वतंत्रपणे करावे. |
| ३ | ४७६ / २००९/ सातारा | ॲड. जे. एस. राजेभोसले बंगला नं. ६२, कॅम्प, एस.टी स्टॅन्डच्या पाठीमागे, सातारा-४१५ ००१ | ग्रामसेवक ग्रामपंचायत, यवतेश्वर, ता. व जि. सातारा | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सातारा | नं.८-अ चा उतारा (मूळ माहिती अर्जातील मागणीबाबत तपशील स्पष्ट नाही) | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४९६ / २००९/ सातारा | श्री. शाम आबा अहिवळे ११५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा | तालुका कृषि अधिकारी, खटाव तालुका कृषि कार्यालय, ता.खटाव, जि.सातारा | उप विभागीय कृषि अधिकारी, सातारा, सातारा उपविभागीय कृषि कार्यालय, सातारा | (मूळ माहिती अर्जातील मागणीबाबत तपशील दिलेला नाही) | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत |
| ५ | ४९७ / २००९/ सातारा | श्री. शाम आबा अहिवळे ११५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा | निवासी नायब तहसिलदार, फलटण, जि.सातारा | तहसिलदार फलटण, जि.सातारा | (मूळ माहिती अर्जातील मागणीबाबत तपशील दिलेला नाही) | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत |
| ६ | ६४६ / सातारा | श्री. जाकीर हुसेन इनामदार १२-ब, डॉ. बापूजी साळुंखे नगर, शिवराज पेट्रोल पंपा जवळ, सातारा | ग्रामसेवक, ग्रामपंचायत सुर्ली, ता.कोरेगाव, जि.सातारा | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती कोरेगाव, जि.सातारा | सुर्ली ग्राम पंचायतीच्या जमा खर्चाच्या तपशीलाच्या कागदपत्रांच्या पहाणीबाबत | अपीलकर्त्याने माहितीची आवश्यकता नसल्याने अपील निकाली काढण्याबाबत त्यांच्या दिनांक २०.६.२००९ च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यास कळविले आहे, हे जन माहिती अधिकारी यांनी सादर केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अपिले अनुक्रमांक १ ते ६ ( अपील क्रमांक ४७४/२००९/सातारा, ४७५/२००९/सातारा, ४७६/२००९/सातारा, ४९६/२००९/सातारा, ४९७/२००९/सातारा, व ६४६/सातारा) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक ४७४/२००९/सातारा मध्ये निष्कर्षात आदेशित केल्यानुसार संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देवून त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास त्वरित सादर करावा, अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्ती व तद्नुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०२-०७-२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

| अ.क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहिती | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४७७ / २००९/ कोल्हापूर | श्री. माणिक आनंदा चौगुले मु.पो. जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | शाखाधिकारी, वसंतराव चौगुले नागरी सहकारी पत संस्था मर्या. कोल्हापूर शाखा, कोडोली, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर | श्रीमती सोनाबाई आनंदा चौगुले यांच्या श्री. वसंतराव चौगुले नागरी सहकारी पत संस्था मर्या. कोल्हापूर कडील कर्जासंबंधी माहिती | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नागरी सहकारी पतसंस्थांना लागू नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिला आहे. |
| २ | ४७८ / २००९/ कोल्हापूर | श्री. परशराम बंडू पाटील ३१५, खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर | १. निवासी नायब तहसीलदार, आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर २. ग्रामसेवक, ग्रामपंचायत हाजगोळी खुर्द, ता.आजरा, जि.कोल्हापूर | १.तहसीलदार आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर, २. विस्तार अधिकारी (उद्योग), पंचायत समिती आजरा, ता.आजरा, जि.कोल्हापूर | मौजे हाजगोळी खुर्द, ता.आजरा येथील ग्रामपंचायत हद्दीतील 'सार्वजनिक गाव चावडी ' या मिळकतीचे भोगवटदार म्हणून ग्राम पंचायत, हाजगोळी खुर्द व श्री भोंबेश्वरी दूग्ध संस्था, हाजगोळी खुर्द यांच्या नावाच्या नोंदी संदर्भात ५ मुद्दे | वेगवेगळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णया विरुध्द अपीलकर्त्याने एकत्रित अपील दाखल केले आहेत. प्रत्येक प्रकरणी अपीलकर्त्याने आयोगाकडे स्वतंत्रपणे अपिले दाखल करावी. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेले अपिले क्र. १ व २ (क्र. ४७७/२००९/कोल्हापूर, क्र. ४७८/२००९/कोल्हापूर) निकाली काढण्यात येत आहेत.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०२-०७-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४८१/ २००९/ पुणे | १) श्री.प्रदीप भिमाजी सांडभोर मु.पो.राजगुरुनगर (तिन्हेवाडी), वैभव कृषी सेवा केंद्र, ता.खेड, जि.पुणे २) श्री.बाळू बाबुराव आरुडे मु.आरुडेवाडी, पो.सांडभोरवाडी, ता.खेड, जि.पुणे | जन माहिती अधिकारी, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर (खेड), ता.खेड, जि.पुणे | प्राचार्य, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर (खेड), ता.खेड, जि.पुणे | प्रवेश प्रसंगी विद्यार्थ्यांकडून घेण्यात आलेल्या अंतर्गत परीक्षा फी च्या संदर्भात अनुषंगिक मुद्दे | १) अपीलकर्त्याने अपील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. २) अपीलकर्त्यास परिपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी, हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर (खेड), ता.खेड, जि.पुणे यांनी आठ दिवसात आयोगास अहवाल सादर करावा. |
| २ | ४८२/ २००९/ पुणे | श्री.प्रकाश दत्तात्रय मांगले दत्तप्रभा, ४८, विवेक सोसायटी, पुणे -९ | १) नगर भूमापन अधिकारी क्र.१, शुक्रवार पेठ, पुणे -२ २) नगर उप अभियंता, विकास योजना क्र.१,पुणे महानगर-पालिका, | उप आयुक्त विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका पुणे-५ | स.नं.६५/२ पद्मावती वसाहत (सहकारनगर) समोरील 'नालंदा बुध्द विहार' येथील जागेच्या मालकी हक्काबाबत | माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार माहिती अर्ज संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे पाच दिवसांत हस्तांतरित करावयास हवा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय, टिळक रोड, पुणे -२ | | | होता. तसी केलेले नाही. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१ यांनी संबंधित माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास आठ दिवसात पुरवावी. मात्र अतिक्रमण असल्यास कारवाई का करीत नाही, ही विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत 'माहिती' ठरत नाही. |
| ३ | २५६३/ ~~२००९/~~ पुणे | श्री.सुरिंदरपाल सी.सेठी ८८, सहाणेय, सुजण पार्क, लुल्लानगर, पुणे-४० | प्राचार्य, सरदार दस्तुर बॉइज स्कूल, तारापोर रोड, पुणे -१ | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे-१ | शाळेतील कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता यादी, ती शिक्षणाधिकाऱ्यांना सादर केल्याची तारीख, अतिरिक्त शिक्षकांची यादी इ. अनुषंगिक मुद्दे | अपीलकर्त्यास माहिती दि.३१.०१.२००९ पर्यंत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२०.०१.२००९ चे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' तील प्रपत्रामध्ये नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. ४८१/२००९/पुणे, ४८२/२००९/पुणे, २५६३/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपील क्र. ४८१/२००९/पुणे व २५६३/पुणे मध्ये वर नमूद केल्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अनुपालन अहवाल आयोगास आठ दिवसात सादर करावा, अन्यथा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २० अन्वये संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे शास्तीसह अन्य तदनुषंगिक कारवाईस पात्र राहतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५ -०७-२००९